# पिंजरा

द्रोणवीर कोहली



पूर्वी प्रकाशित झालेल्या कथेचे रूपांतर.
राज्य संशोधन केंद्र, दिल्ली, युनिसेफ आणि नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया,
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेत या पुस्तकाची निर्मिती झाली.

ISBN 81-237-0318-X

पहिली आवृत्ती 1993 (*शके* 1914)
दुसरी आवृत्ती 2002 (*शके* 1923)
मूळ © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 1990
Pinjara *(Marathi)*

**रु. 9.00**

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क
नवी दिल्ली-110 016 यांनी प्रकाशित केले.

*नवसाक्षर साहित्यमाला*

# पिंजरा

द्रोणवीर कोहली

अनुवाद


बाळकृष्ण बोकील

चित्रे

चित्रक



नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया




एकदा मी एक पोपट पाळला होता. कसं कोणास ठाऊक, पण एक दिवस पिंजऱ्याचं दार उघडं राहिलं. एक काळी मांजर आली आणि पोपटाला तोंडात पकडून पळून गेली. मी सुन्न होऊन नुसतं बघतच राहिलो.

ह्या प्रसंगानं मी फार अस्वस्थ झालो. मला वाईट याचं वाटलं होतं की आमच्याच चुकीनं पोपटाचा मृत्यू ओढवला होता. नुकताच थोड्या दिवसांपूर्वीच हा पोपट आम्ही पाळला होता. सगळ्यांच्या बरोबर त्याचं छान जमलं होतं. मस्तपैकी गप्पा मारत असायचा. माझ्या भावानं-गोपीनं-तर त्याच्याकडून काही दोहे पाठ करून घेतले होते. मोठ्या गमतीदार पध्दतीनं तो म्हणत असे-

चटपट पैंची, चतुर सुजान ।
सबके दाता श्रीभगवान ॥

तो पोपट जेव्हा हे म्हणत असे तेव्हा गोपीची हसून हसून पुरेवाट होई.



पोपट नाहीसा झाल्यामुळे घर कसं उदासवाणं झालं होतं. त्या दिवशी मी आणि गोपीनं काहीही खाल्लं नाही. रिकाम्या पिंजऱ्याकडे लक्ष गेलं की मन गदगदून जायचं. शेवटी मला राहवेना. मग मी पिंजरा बोरीच्या फांदीवरून काढला आणि एका कोपऱ्यात ठेवून दिला. त्याच वेळी मी निश्चय केला की आता पोपटच काय पण कोणताही प्राणी पाळायचा नाही.

आमच्या घराच्या अंगणातून रोज पोपट उडत जात असत. संध्याकाळी तर पोपटांचे थवेच्या थवे येत आणि किलबिलाट करीत निघून जात. त्यावेळी मी अंगणात खाट टाकून पडून रहात असे आणि उडणारे ते पोपट पहात असे. आधी लांबूनच त्यांचा मंजूळ आवाज सावकाश ऐकू येई. मग खूप मोठ्या संख्येने पोपट उडत येत आणि नाहीसे होत. क्षणार्धात आकाश रिकामे होऊन जाई. पण थोड्याच वेळात आणखी एखादा थवा उडत उडत येऊन जाई. ते पाहून मला माझ्या पोपटाची आठवण येई आणि मी खिन्न होत असे.


खरं म्हणजे संध्याकाळ व्हायला लागली की पोपटांचा परतीचा प्रवास सुरू होई. अंधार होण्यापूर्वीच ते आपापल्या



घरट्यात परत जात असत. आमच्या गावाबाहेर एक नदी होती. तिच्या काठावर वड, पिंपळ असे मोठमोठे वृक्ष होते. या झाडांवरच पोपटांनी त्यांची घरटी बांधली होती. ते तिथेच रहात असत. एक गोष्ट मात्र माझ्या लक्षात आली होती की, अंधार पडल्यानंतर एकही पोपट आकाशात दिसत नसे. हे पाहून मला नेहमी आश्चर्य वाटत असे. पोपट अगदी ठरलेल्या वेळी येत असतआणि घरट्यात परत जात असत, परंतु आम्ही मात्र आमचं काम कधीही वेळेवर करत नाही.

एक दिवस मोठी आश्चर्याची गोष्ट घडली. संध्याकाळची वेळ होती. मी अंगणात खाटेवर पडून आराम करत होतो. हळूहळू अंधार होऊ लागला होता. नुकतेच पोपटांचे थवे येऊन गेले होते. लहान लहान चतुर पक्षी पंख फडफडावीत उडताना दिसत होते. अंगणात एकीकडे गाय आणि म्हैस रवंथ करीत बसल्या होत्या. मधून मधून त्यांच्या गळयातल्या घंटांचा नाजुकसा आवाज ऐकू येत होता. आकाशातून एखादा कावळा किंवा कबूतर मधूनच एखाद्या सावलीप्रमाणे तरंगत निघून जात होते.

मी पडल्या पडल्या हे सगळं पहात होतो. तेवढ्यात अचानक कुठून तरी पोपटाचा आवाज ऐकू आला. मी जरा चमकून उठून बसलो. जवळच कुठं तरी पोपट बोलल्यासारखं मला वाटलं. प्रथम हा भास असेल असंही मला वाटलं.



मी इतके दिवस पोपट पहात होतो, पण अंधार झाल्यावर पोपटाचा आवाज कधीच ऐकू आला नव्हता. मी चकित होऊन इकडे तिकडे पाहू लागलो. तेवढ्यात पुन्हा एकदा पोपटाचा आवाज स्पष्टपणे ऐकू आला.

मी चौकसपणे पाहू लागलो, तर काय एक पोपट वरून जाताना दिसला पण पुढं जाऊन तो लगेच परत आला. थोडा वेळ अंगणावर फिरला आणि पुन्हा बोरीवर जाऊन बसला. बसल्यानंतर तो दोन-तीनदा बोलला. एकदा त्यानं पंखही फडफडविले. त्यानंतर मात्र एकदम शांतता झाली. वाराही जणू काही बंद झाला होता. झाडाचं पानही हालत नव्हतं.

मी डोळे ताणून बोरीच्या झाडाकडे पहात होतो. मग एकदम एक गोष्ट माझ्या लक्षात आली. कदाचित एखादा पोपट आपल्या थव्यातून चुकला असावा आणि फिरूनफिरून दमल्यामुळे बोरीवर येऊन बसला असावा.

आता खूप अंधार झाला होता. पोपटाचा आवाजही ऐकू येत नव्हता. त्यामुळे मी गुपचूप उठलो आणि आत गेलो. का कुणास ठाऊक, मला सारखं वाटत होतं की पोपट इथंच रात्रभर बोरीवर बसून राहणार आहे. म्हणून मी त्याला खाण्यासाठी थोडी भाकरी घेऊन आलो. वर पहात झाडाच्या खोडापाशी भाकरीचे तुकडे पसरून ठेवले. जवळच पाण्याचा वाडगाही भरून ठेवला.

हे सगळं करून मी आत गेलो आणि अंथरूणावर पडलो. पण मला झोप लागली नाही. पुन्हा पुन्हा एक सुंदर पोपटाची मूर्ती माझ्या डोळ्यापुढे येत होती. त्याबरोबरच मला काळ्या मांजरीने पळवलेल्या माझ्या पोपटाची आठवण झाली. हया गोष्टीला इतकी वर्षे झाली होती, पण तेव्हापासून मांजरीच्या जबड्यात अडकलेला पोपट सारखा मला नजरेसमोर दिसत असे.

ह्या विचारात मला कधी झोप लागली ते कळलेच नाही-

सकाळ झाल्यावर आधी मी अंगणात गेलो. तो पोपट बोरीच्या खाली बसलेला होता. त्याला पाहून मी आश्चर्यचकित झालो आणि मला खूप आनंदही झाला. मी रात्री टाकलेली

भाकरी तो मोठ्या मजेत खात बसला होता. अधूनमधून वाडग्यातले पाणी पीत होता. मी मंत्रमुग्ध होऊन त्याच्याकडे पहात राहिलो. हा पोपट किती सुंदर आहे कसा चमकदार हिरवा रंग आहे. चोच पण किती लाल-लाल आहे ! आणि त्याच्या गळयाभोवतालची पट्टी-ती तर गुलाबीही आहे आणि लालही आहे !

"अहाहा ! कित्ती सुंदर पोपट !" माझ्या तोंडून नकळत शब्द बाहेर पडले. मी स्वतःला विसरून लालचावलेल्या नजरेने त्याच्याकडे पहात राहिलो. मनात विचार आला, "हया पोपटाला आपण पाळू या !" बस्स ! हा विचार मनात आल्या बरोबर मी एक कापड घेतलं आणि दबकत पोपटाकडं जाऊ लागलो. पोपट होता तिथंच बसून भाकरी खात होता. त्याला कल्पनाही नव्हती की लवकरच एक भलं मोठं संकट त्याच्यावर येणार आहे. मी त्याच्या अगदी जवळ गेल्यावर त्यानं चमकून माझ्याकडे पाहिलं. मग जोर जोराने ओरडू लागला. एकदा उडण्याचाही प्रयत्न केला. पण जमिनीपासून चार-पाच फूट उडून परत खाली बसला. पुन्हा चालत चालत जाऊन झाडाच्या खोडाला चिकटून बसला.

त्या पोपटाला उडता येत नाही ही गोष्ट माझ्या लक्षात आली नाही. ही मोठी वाईट वाटणारी बाब होती. रात्री मी त्याला उडत येताना पाहिलं होतं, मग एका रात्रीत हयाला काय झालं ?

मी एकदम झडप मारून पोपटाला पकडलं. त्याबरोबर तो कापडाच्या आतून जोरजोरात ओरडू लागला. मी त्याला हाताने पकडल्यावर तो आणखीच जोराने ओरडला. त्याचा आवाज असा काही होता की माझं हृदय हेलावलं. एकदा तर असं वाटलं की माझा पहिला पाळलेला पोपटच मांजरीच्या तोंडात तडफड करीत आहे.

हा पोपट रात्री परत फिरून बोरीवर का येऊन बसला असावा हे आता माझ्या लक्षात आलं. त्याच्यावर कोणीतरी हल्ला केला असेल किंवा आणखी कांहीतरी झाले असेल. त्याशिवाय तो अंधारात असा एकटाच फिरत राहिला नसता.

पण मी मात्र त्याला रात्री खायला प्यायला दिलं होतं ! हा विचार माझ्या मनात येऊन

मला खूप बरं वाटलं.

तो पोपट मात्र माझ्या हातात थरथरत होता. मी त्याला कुरवाळत म्हटलं, "मिठ्ठू मियां ! घाबरू नकोस ! मी तुला खूप प्रेमानं वागवीन. माझ्याकडं एक सुंदर पिंजरा आहे. तुला रोज हिरवी हिरवी मिरची देईन. सकाळी संध्याकाळी फुटाणे आणि भाकरी देईन. जमलं तर सफरचंदही देईन. तुला छान छान बोलायला शिकवीन. आणि हो ! एकेका मांजराला हुडकून



काढून गावाबाहेर हाकलून देईन..."

खरं तर असं करून मी काही पोपटावर फार मोठी दया करत नव्हतो, तर माझ्याच मनातली इच्छा पूर्ण करत होतो. पुन्हा एकदा पोपट पाळावा असं मला वाटू लागलं होतं...तसं कधीही न करण्याचा निश्चय केलेला असूनही.

बस्स ! शेवटी मला हवं होतं तेच मी केलं. अंगणात ठेवलेल्या पिंजऱ्याचा रंग उन्हामुळे आणि वाऱ्या-पावसामुळे खराब झाला होता. जरा झाडून-पुसून मी तो पिंजरा बोरीच्या फांदीवर लटकवला आणि पोपटाला आत बंद करून ठेवलं. पिंजऱ्यात गेल्याबरोबर पोपटानं सारं घर डोक्यावर घेतलं.

पण मी खुषीत होतो. थोड्याच वेळात माझा धाकटा भाऊ गोपी तिथं आला आणि इतका सुंदर पोपट पाहून एकदम खूष झाला. त्याला हा पोपट खूपच आवडला होता. तो पिंजऱ्याकडे पहातच राहिला आणि म्हणाला, "दादा, इतका सुंदर पोपट तू कोठून आणलास ?"

मी त्याला रागावलो, "हे बघ ! असं एकसारखं पोपटाकडे पहायचं नाही. त्याला दृष्ट लागेल. जा बघू, तुझं काम कर !"



त्यावर गोपी माझी चेष्टा करत म्हणाला "दादा ! इतका मोठा झालास तरी अजून असला संशय घेतोस ?"

पोपट सतत ओरडत होता. त्याला बहुतेक समजलं असावं की या कैदेतून आता आपली सुटका नाही. पण तो जितका ओरडत असे तितका मला आनंद होत असे. पिंजऱ्याच्या सळया पकडून मी त्याला म्हटलं, "मिठ्ठू मियां, आतां ओरडून काही उपयोग होणार नाही. मी तुला वाचवलं यातच तू आनंद मान. जर मांजर रात्री इकडं आली असती तर तिनं तुला जिवंत सोडलं नसतं ! आता तू शांत बसून रहा. तू काहीतरी पुण्य केलं होतंस म्हणून आमच्या अंगणात आलास ! नाहीतर तुझा जीवच गेला असता ! ते असू दे ! मी आता तुला हिरवी मिरची आणून देतो."

घरून मी एकदोन हिरव्या मिरच्या आणल्या. पिंजऱ्यात मिरच्या ठेवून पाण्याच्या वाटीत पाणीही भरून ठेवलं. पण पोपटानं साधी नजर वर करूनही हया गोष्टींकड पाहिलं नाही. जणू काही तो असं दाखवून देत होता की कैदेत सोन्याच्या वस्तू मिळाल्या तरी मी त्याला हात लावणार नाही.

मी म्हटलं. "मिठ्ठूमियां, खाल्लं नाही तर जगणार कसा ? मिरची खा आणि म्हण, "राम-राम !"

पण पोपट एखाद्या पुतळ्यासारखा गप्प बसला होता. मी पुन्हा त्याला म्हटलं, "गंगाराम, माझ्याबरोबर म्हण-

चटपट पैंची, चतुर सुजान ।
सबके दाता श्री भगवान ॥

पण पोपट मात्र पहिल्यांदाच सासरी आलेल्या मुलीसारखा गप्प होता. मी त्याला कुरवाळलं. दिलासा दिला. पण त्यानं नजर वर करून माझ्याकडंही पाहिलं नाही आणि मिरची-पाण्याकडंही पाहिलं नाही. पण तो अधून मधून आकाशाकडं तोंड करून बोलायचा प्रयत्न करायचा. जणू कोणाची तरी वाटच पहात होता की, कोणीतरी येईल आणि त्याला

सोडवून घेऊन जाईल.

त्याची ही स्थिति पाहून मी थोडा उदासवाणा झालो. पण मी विचार केला आत्ता कुठं नवीनच आला आहे हळूहळू मिसळेल सगळ्यांमध्ये.

पण दिवस मावळल्यावर पोपटाची अस्वस्थता वाढू लागली. पिंजऱ्याच्या सळयांना चोचीत पकडून तोडायचा प्रयत्न करू लागला. कधी वर पाहून बोलू लागला. पंख फडफडवू लागला. हे सगळं पाहून मला पोपटाची दया येत असे आणि एकीकडे आनंदही होत असे.

बघता बघता संध्याकाळ झाली. पोपट परत फिरण्याची ही वेळ होती. मी ओसरीवर उभा राहून पहात होतो. तेवढ्यात पोपटांचा एक थवा आरडाओरड करीत आला आणि अंगणातल्या बोरीवर येऊन बसला. सगळ्या अंगणात एकच गोंधळ उडाला. त्या पोपटांबरोबर पिंजऱ्यातला पोपटही बोलू लागला. तो पुन्हा पुन्हा सळई पकडून हलवू लागला.

हे पाहून मी म्हटलं, "अरे राजा, असं करू नकोस. इतकी ताकद लावू नकोस. एखादे वेळी तुझी चोंचच मोडून जायची. हा पिंजरा धोंडू लोहारानं चांगला भक्कम बनवलाय ! एवढासा जीव तुझा ! उगीचच लोखंडाच्या सळयांशी झटापट करतोस."

एवढ्यात मला काय वाटलं कुणास ठाऊक ? मी हसत हसत पिंजरा काढून ओसरीकडे जाऊ लागलो. हे पाहताच सगळे पोपट माझ्या डोक्यावर घिरट्या घालू लागले आणि ओरडू लागले.

माझ्या लक्षात आलं की मी जर पिंजरा खाली ठेवला नाही तर पोपट मला चावले असते. कदाचित डोळे फोडतील नाहीतर कान कुरतडतील. हया विचाराने मी इतका घाबरलो की पिंजरा तिथंच सोडून ओसरीत पळत आलो.

धापा टाकत मी समोरचे दृश्य पहात होतो. सगळेच्या सगळे पोपट पिंजऱ्यावर बसून सळयांशी झटापट करीत होते. असं वाटत होतं की जणू काही पिंजरा तोडून ते आपल्या मित्राला सोडवून घेऊन जातील.


Chitrak

इतका मजेशीर खेळ मी यापूर्वी कधीच पाहिला नव्हता. मग मला काय वाटलं कुणास ठाऊक, मी त्या पोपटांना जणू काही चिडवीत म्हणालो, "अरे मूर्खांनो, चोचींनी कधी पिंजरे तुटतात का ?"

आता खूप गडद अंधार झाला होता. शेवटी ते दमलेले पोपट आरडाओरड करत उठले आणि पहाता पहाता नजरेपार झाले. थोडा वेळ लांबूनच कुठून तरी त्यांचा आवाज ऐकू येत राहिला. मग तो आवाजही येईनासा झाला. पिंजऱ्यातला पोपटही निराश होऊन गप्प बसला होता.

आता मी एक निःश्वास सोडला. सगळ्या पोपटांनी कसला गोंधळ घातला होता ! बाप रे !

बराच वेळ झाला होता. म्हणून मी अंगणातून पिंजरा उचलला आणि ओसरीवर छाताच्या कडीला लोंबणाऱ्या एका दोराला टांगून ठेवला. काळजीपूर्वक दरवाजा बंद करून मोठ्या खुषीने आत गेलो. जेवणखाण करून बिछान्यावर पडलो. आज जगात माझ्यासारखा आनंदी माणूस कोणीही नव्हता.

त्यातच कधीतरी मला झोप लागली

पण रात्री मला एक अदभुत स्वप्न पडले. मी स्वप्नात पाहिलं की...

आमच्या गावतले सगळे लोक बैलगाड्यांमध्ये बसून घनदाट जंगलातून चालले आहेत. दाट अंधारी रात्र आहे. थंडीचे दिवस आहेत. दातावर दात आपटून वाजताहेत आणि बैलगाड्यांची भली मोठी रांग वाटचाल करीत आहे.

त्यानंतर एकाएकी असं झालं की, गाडयांना जुंपलेले सगळेच्या सगळे बैल एकदम बिथरले. गुडघे टेकून तिथंच बसले. हे सगळं पाहून आम्ही इतके घाबरलो की चटकन् बैलगाड्यातून खाली उतरलो. आम्ही उतरल्याबरोबर सगळे







बैल उठून उभे राहिले. त्यानंतर आणखीच विचित्र गोष्ट घडली. एकाएकी सगळया बैलगाडया जमिनीपासून दोन-तीन फूट वर उचलल्या गेल्या आणि वरच्यावर तरंगत राहिल्या. थोडयाच वेळात पाहता पाहता त्या दूर कुठंतरी आकाशात जाऊन दिसेनाशा झाल्या. जणू काही बैलगाड्या म्हणजे नावा होत्या आणि बैल पायांनी वल्ही मारत होते.


हे पाहून माझ्या आश्चर्याला पारावार राहिला नाही. तोंडातून शब्दही फुटत नव्हता हया धक्कयातून बाहेर पडलो तेव्हा कुठं एकमेकांशी बोलायला लागलो. कोणी म्हणालं की भुता-खेतांनी गाड्या ओढून पाताळात नेल्या कुणी काही म्हणे, कुणी काही.

सगळ्यांचे चेहरे उतरले होते. चारी बाजूस गडद अंधार आणि नीरव शांतता होती. कुणाजवळही जास्त कपडे नव्हते.

थंडीचा कडाका जाणवत होता आणि थंडीपासून शरीराचे संरक्षण करायला काहीही मार्ग नव्हता. आपण कुठे आहोत हे समजण्यासाठी उजेड करून पहावे म्हटले तर कोणाकडे साधी काडेपेटीही नव्हती. रस्त्याच्या दोन्ही बाजूस घनदाट जंगल होतं. ताठ उभं राहिलेल्या देवांप्रमाणे उंच उंच वृक्ष आजूबाजूला होते. हे सगळं बघूनच जीव घाबराघुबरा व्हायला लागला.

मग कोणी तरी म्हटलं, "असं उभं राहून काय पहात राहिला आहात ? चला, चालायला लागा. देवदयेनं सारं काहीं ठीक होईल !"

नंतर सगळेजण चालू लागले. पण कुणालाच कळत नव्हतं की आपण कुठं चाललो आहोत. आम्ही जसजसं पुढे जाऊ लागलो, तसतसा रस्ता आणखी अरुंद होऊ लागला. असं वाटत होतं की जणू काही एखाद्या अरुंद दरीतून माणसांची नदीच वहात चालली आहे.






गोपीनं माझ्या धाकट्या भावानं आईचं बोट घट्ट पकडून धरलं होतं. त्याला पुन्हा पुन्हा रडू येत होतं. एवढ्यात मागून माणसांचा एक लोंढा पळत पळत आला आणि आरडा-ओरड करत पुढं निघून गेला. हळू हळू ढकला ढकली थांबली. पण जेव्हा आमच्या लक्षात आलं की गोपी दिसत नाही तेव्हा मात्र आम्ही हबकूनच गेलो. आई तर कावरी बावरी होऊन इकडे तिकडे पहात राहिलो. ती म्हणत होती, "अरे, तो आत्ता तर माझं बोट पकडून बरोबर चालत होता असा कसा कुठं गेला बाई ! मग आईनं जे रडणं-ओरडणं सुरू केलं, ते काही केल्या थांबेचना. सगळ्यांनी समजूत काढली की काळजीचं कारण नाही, मुलगा मिळेल, पण आईचे अश्रू काही थांबत नव्हते.

हे सगळंच मोठं आश्चर्यचकित करणारं होतं. आत्ता आत्ता गोपी आमच्याबरोबर होता. मग एकाएकी कुठं गायब झाला ?

ही बातमी कळल्याबरोबर सगळीकडे एकच खळबळ उडाली. सगळेजण गोपीच्या नावाने हाक मारू लागले. पण गोपी जणू काही सगळ्यांच्या डोळ्यात धूळ फेकून नाहीसा झाला होता.

रडून रडून आईची स्थिती अतिशय वाईट झाली होती. ती एखाद्या वेड्यासारखी ओरडत होती. सगळे लोकच जणू काही कावरे बावरे झाले होते.



तेवढ्यात अचानक गोपीचा रडण्याचा आवाज कानावर आला. तसे सगळे एकदम थांबून पाहू लागले. हा आवाज कुठून येत होता बरं ? अंधार तर इतका होता की स्वत:चा हातही दिसत नव्हता. गोपीच्या रडण्याचा आवाज आणखी जोरात येऊ लागला.

त्याबरोबर गोपीच्या आवाजाच्या दिशेला सगळेजण धावले. आधीच खूप अंधार होता. सगळ्या लोकांच्या पायांनी उडालेल्या धुळीमुळे तो आणखीच दाट वाटत होता.

तेवढ्यात वीज चमकली. त्या उजेडात आम्ही पाहिलं की पुढचा रस्ता उंच उंच डोंगरात जाऊन नाहीसा झाला आहे. हे पाहून सगळ्यांची स्थिती मोठी केविलवाणी झाली. त्यानंतर जेंव्हा सिंहाची गर्जना आणि हत्तीचा चित्कार ऐकला तेव्हा मात्र सगळ्यांची दातखीळ बसली. त्याचवेळी पुन्हा एकदा वीज चमकली. आम्ही पाहिले की रस्त्यात मधोमध एक सिंह बसलेला होता, सिंह बघून लहानांचेच काय, पण मोठ्या माणसांचेही प्राण कंठाशी आले.

तेवढ्यात सिंहाची गर्जना कानावर पडली. त्याची ही गर्जना इतकी भीतीदायक होती की सगळ्यांच्या अंगावर भीतीने काटा उभा राहिला. त्याबरोबरच सिंहाच्या मागून कुठून तरी गोपीच्या रडण्याचा आवाजही येत होता.

आईने मुलाचा आवाज ऐकला आणि ती धावत सुटली. ती सिंहाला घाबरली नाही की अंधाराला घाबरली नाही. शेवटी ती एक आई होती. गोपीचा आवाज येत होता त्या दिशेला ती पळत सुटली.

"थांब आई, थांब !" तिच्यामागून धावत जाऊन मी तिला अडवलं. इतर लोकही आले.

तेवढ्यात जणू काही आईची चेष्टा मस्करी करण्यासाठी सिंह म्हणाला, "काय ग ? आपल्या मुलाला बघायला चाललीस वाटतं ?"

सिंहाला माणसासारखं बोलताना बघून आम्ही तिथंच थबकलो. त्यानंतर सिंहाने आणखी एकदा गर्जना केली आणि म्हणाला, "माणूस मोठा भित्रा असतो. हा ! हा ! हा ! आणि मग हसत हसत लहान मुलाशी बोलाव तसं म्हणाला, हे पहा घाबरण्याचं काही कारण नाही. तुमचा मुलगा सुरक्षित आहे. आता तुमच्यापासून काय लपवून ठेवू ? मला मूल नाही.

माझ्या प्रधानानं, गजदत्तानं, मला सांगितलं की मी तर माणसाचं मूल पाळलं तर मलाही मूल होईल..."

आई गप्प उभी होती. ती डोळ्यात आसवं आणून सिंहाकडे पहात राहिली होती. मग पदर पसरीत, दयेची भीक मागत म्हणाली, "माझ्या बाळाला माझ्याकडे देरे बाबा !"

गावचे सगळे लोक हात जोडून सिंहाची विनवणी करू लागले, "महाराज, या म्हातारीच्या मुलाला सोडून द्या. तुमची फार मोठी मेहेरबानी होईल. म्हातारीचा आशीर्वाद आपल्याला मिळेल. ती तुमचे नाव आयुष्यभर घेत राहील."

सिंह असा बसला होता की हे सगळं बोलणं मनातल्या मनात तपासून पहात होता. मग हळू हळू स्मित करीत म्हणाला, "ठीक आहे जा, पुढे पिंजऱ्यात तुमचा मुलगा बंद करून ठेवला आहे. त्याला सोडवून घेऊन जा ।"

तेवढ्यात पुन्हा एकदा वीज चमकली. विजेच्या उजेडात आम्हाला जे काही दिसलं त्यानं आमच्या जिवाचा थरकाप झाला. एका मोकळ्या मैदानात मधोमध एक खूप मोठा पिंजरा ठेवलेला होता आणि त्या पिंजऱ्याच्या आत उभा राहून गोपी मुसमुसत होता.

सगळ्यांच्या आधी आई धावली. तिच्यामागे मी धावलो. आमच्यामागे सगळा गाव धावत आला.

आम्हाला पाहताच गोपी पिंजऱ्याच्या सळईला पकडून जोरजोरात रडू लागला, "मला वाचवा, नाहीतर सिंह मला खाऊन टाकील."

आई धावत जाऊन पिंजऱ्याला धरून उभी राहिली. ती "माझ्या बाळा रे ।" असं म्हणत हाक मारत होती.


तेवढ्यात सगळे गावकरी पिंजऱ्याच्या चारी बाजूस येऊन उभे राहिले होते. सगळे लोक इकडं तिकडं फिरून दरवाजा शोधत होते. दरवाजा असला तरी त्यांना तो दिसत नव्हता. गोपी रडत रडत म्हणत होता, "आई, मला वाचव गं, इथून सोडव. नाहीतर ही जनावरं मला खाऊन टाकतील.

तिकडं आई तर पिंजऱ्याच्या सळयांवर डोकं आपटत राहिली होती.

हे सगळं पाहून सिंहाला मोठी गंमत वाटत होती. पुन्हा एकदा गर्जना करून् तो हसला आणि म्हणाला, “अरे भेदरटांनो, जा, आपल्या घरी परत जा. पिंजऱ्याच्या सळयांवर डोकं आपटू नका. त्याची मुळं पार पाताळात गेली आहेत.”

सिंहाचे हे बोलणे ऐकून आईने एकदम आक्रोश केला आणि तिथेच ती बेशुध्द होऊन पडली...

आणि त्याचवेळी माझी झोप पूर्ण झाली. मी खडबडून जागा झालो. मी पाहिलं की मी जंगलात नाही तर माझ्या बिछान्यात



बसलेलो आहे. पण त्या सिंहाची गर्जना अद्यापही माझ्या कानात घुमत होती.

मला काय वाटलं कोणास ठाऊक, पण गोधडी दूर करून मी उठलो आणि पळत बाहेर आलो.

अंगणात सकाळचा उजेड पसरू लागला होता. मी पेंगुळलेले डोळे चोळीत उभा होतो. तेवढ्यात ओसरीवरून पोपटाच्या ओरडण्याचा आवाज माझ्या कानावर आला. मी तसाच अनवाणी पायांनी धावत गेलो. ओसरीचा दरवाजा उघडा होता, हे पाहून मी अतिशय घाबरलो. पण मी आत गेल्या गेल्या पिंजऱ्यावर चढलेल्या एका मांजरीने खाली उडी मारली आणि दरवाज्यातून ती पळून गेली.



जणू काही माझं काळीजच हललं. पोपट घाबरून ओरडत होता. पण नशिबाने तो थोडक्यात वाचला होता.

हे पाहून माझ्या जिवात जीव आला. मला थोडा जरी उशीर झाला असता तरी मांजरीने पोपटाला मारून टाकले असते ह्या विचाराने माझा थरकाप होत होता.

मला पाहून पोपटाने हळूच ओरडल्याप्रमाणे आवाज काढला. जणू काही मी वेळेवर आलो म्हणून तो मला धन्यवाद देत होता. नंतर डोळे मिटून तो शांत बसून राहिला.

थोडा वेळ मी त्याला निरखून पहात राहिलो. मग माझ्या मनात काय आलं कोणास ठाऊक, मी उभ्या उभ्याच पुन्हा एकदा निश्चय केला, "मी ह्या पोपटाला कैदेत ठेवणार नाही. त्याला आत्ता, लगेच मोकळं करणार !"



मग मी दुसरा कसलाही विचार केला नाही. हळू हळू मी चालत गेलो पिंजरा खाली घेतला. पिंजरा हातात घेऊन मी बाहेर अंगणात आलो आणि पिंजऱ्याचा दरवाजा उघडला.

पोपटाने हळूच डोळे उघडून पाहिले. मग हळूच डावी उजवीकडे डोळे फिरवले. त्याला जणू काही आश्चर्य वाटत असावे की तो स्वप्न तर पहात नाही ना ?

मग तो दोन पावले टाकून पिंजऱ्याच्या दरवाज्याजवळ आला आणि भुर्रकन् उडून गेला.

रिकामा पिंजरा हातात धरून मी चकित होऊन पहात राहिलो. हा पोपट रात्री आला होता तेव्हा घायाळ झालेला होता आता अचानक असा कसा उडून गेला ? रात्रीच्या रात्री त्याची जखम बरी झाली ? का स्वातंत्र्य मिळाल्यामुळे त्याच्या अंगी एवढी ताकद आली की पंख फडफडवीत उडून गेला ?



रु. 9.00 ISBN 81-237-318-X

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया